# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक ४ एप्रिल, २०१३.

## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

**शासकीय विधेयक -**

**विचार, खंडश: विचार व संमत करणे - चर्चा पुढे सुरु -**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३.

(क) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सद्य अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सद्य अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

(अ) **तारांकित प्रश्न.**

(ब) **गुरुवार, दिनांक २८ मार्च, २०१३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**तीन : म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचना - (असल्यास).**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - (असल्यास).**

**पाच : लक्षवेधी सूचना - (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

**(१) ॲड. आशिष शेलार,** सर्वश्री. विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"खार दांडा, खार (प.) येथील सिटी सर्वे नं. १११८/१९८०/डी.१९५७, ही जागा सन १९८३ साली मुस्लीम समाजाच्या दफनभूमीसाठी देण्यात आलेली असूनही आजतागायत या जागेवरती दफनभूमीसाठी आवश्यक कोणतेही बांधकाम झालेले नसणे, तसेच त्यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात आलेली नसणे, मुस्लीम समाजासाठी वांद्रे व खार पश्चिमेस कुठेही दफनभूमी नसल्याने या दफनभूमीसाठी आवश्यक बांधकाम त्वरीत करुन देण्यासाठी वेळोवेळी स्थानिक प्रतिनिधींनी पाठपुरावा करुन देखील आजतागायत या संदर्भात कोणताही निर्णय न होणे, मुस्लीम समाजात याबाबत निर्माण झालेला तीव्र संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

**(२) श्री. निरंजन डावखरे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील शैक्षणिक संस्थांच्या अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये ग्रामीण तसेच अतिदुर्गम भागातील गरीब कुटुंबातील बहुसंख्य विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत असून, या शाळांचा दैनंदिन किरकोळ खर्च, दुरुस्तीचा खर्च व विजेचे बिल अदा करणे इ. खर्च विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणाऱ्या शालेय फीच्या तुटपुंज्या रकमेतून करण्यात येणे, राज्यातील शैक्षणिक संस्थांना विजेचे बिल प्रामुख्याने उच्च दाब (High Tension) दराने आकारण्यात येणे, या शैक्षणिक संस्थांकडून माहे जून, २००८ पूर्वी ज्याप्रमाणे लघु दाब (Low Tension) दराप्रमाणे विद्युत बिल आकारण्यात येत होती त्याचप्रमाणे आताही लघु दाब (Low Tension) दराप्रमाणे विद्युत बिल आकारणीची वारंवार मागणी होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,** चरणसिंग सप्रा, श्रीमती अलका देसाई **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"फिल्मसिटी ते बोरीवलीच्या नॅशनल पार्क या सुमारे २०० चौरस किलोमीटरच्या जंगलाला दिनांक ४ मार्च, २०१३ रोजी सायंकाळी भीषण आग लागणे, मुंबईच्या मधोमध

असलेल्या या निबिड जंगलाला यापूर्वी असा भयानक वणवा कधीच लागला नसणे, या जंगलात अनेक दुर्मिळ औषधी वनस्पतींचा साठा असणे, तसेच वाघांपासून अनेक जातीचे वन्यप्राणी असलेल्या या जंगलात झोपडपट्टीदादांनी अतिक्रमण करुन वन्यजीवांना हद्दपार केले असणे, या आगीमागे झोपड्या बांधण्याचा डाव असल्याची नागरीकांमध्ये पसरलेली भावना, शासनाने या प्रकरणी चौकशी करुन तातडीने करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच प्रतिक्रिया."

(४) **श्री. राम पंडागळे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना देण्यांत येणारा निर्वाहभत्ता, शिक्षण फी दिनांक १ फेब्रुवारी, २०१० रोजीपासून महाविद्यालयांना देणे बंद करुन कोअर बँकिग सुविधा उपलब्ध असलेल्या राष्ट्रीय बँकांमध्ये महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी खाती उघडण्याची कार्यवाही सुरु करण्याचे सांगण्यात येणे, मात्र सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या अनास्थेमुळे ठाणे जिल्ह्यातील हजारो मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप न मिळणे, परिणामी मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री. दिवाकर रावते वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मौजे धानिवरी (तालुका-डहाणू, जिल्हा-ठाणे) येथील आदिवासी जंगल कामगार सोसायटीची जमीन विक्री करण्यास शासनाने दिलेली मंजूरी, शासनाच्या या परवानगीमुळे करोडो रुपयांची जमीन अवघ्या ८ लाख रुपयांत विकली जाणे, सदर जमीन विक्री प्रस्तावास शासनाने प्रथम मंजूरी न देणे, तथापि दुसऱ्या वेळी जमीन विक्रीस अनुमती देण्यात येऊन त्यात करोडो रुपयांचा झालेला गैरव्यवहार, यासंदर्भात सन २००० पासून तत्कालीन मुख्यमंत्री, सहकार मंत्री, आदिवासी विकास मंत्री, सहकार आयुक्त इत्यादींकडे वेळोवळी तसेच दिनांक २९ जानेवारी, २०१३ रोजीच्या पत्रान्वये तक्रारी करण्यात येऊनही या संदर्भात कोणतीही कार्यवाही न होणे, सदर जमीन विक्री रद्द करुन या संदर्भात चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये विशेषतः आदिवासी जंगल कामगारांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, शासनाने यासंदर्भात तातडीने

केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

(६) **श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मिरा-भाईंदर शहराची आजमितीस लोकसंख्या १५ लाखांवर असताना स्टेम प्राधिकरणाकडून ८६ एम.एल.डी. आणि एम.आय.डी.सी. कडून ३० एम.एल.डी. अशा एकंदर ११६ एम.एल.डी. पैकी गळती वजा करता प्रत्यक्षात केवळ १०० एम.एल.डी. म्हणजेच जेमतेम १० लाख लोकसंख्येला पुरेल इतकाच होत असलेला पाणीपुरवठा, प्रत्यक्षात २२५ एम.एल.डी. पाण्याची असलेली आवश्यकता, तब्बल ४० ते ४२ तासानंतर १ तासच पाणीपुरवठा होणे, नवी मुंबई महानगरपालिकेने त्यांच्याकडील मोरबे धरणातील अतिरिक्त शिल्लक पाण्यामधून दिनांक ९ जून, २००५ रोजीच्या पत्रान्वये १०० एम.एल.डी. पाणी देण्याचे मान्य करुनही ते अद्याप मिरा-भाईंदर महानगरपालिकेला न मिळणे, शहरामध्ये निरनिराळ्या एम.एम.आर.डी.ए., म्हाडा व इतर गृहनिर्माण योजना लागू होण्यामुळे कमीत कमी ५ लाख लोकसंख्येची भर पडणे, १२५ कोटी रुपये कर्ज असणारी मिरा-भाईंदर महानगरपालिका एवढ्या प्रमाणात वाढणाऱ्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यास असमर्थ असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

(७) **डॉ. दिपक सावंत वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्याच्या आदिवासी विभागाच्या शबरी महामंडळाकडून केंद्र सरकारच्या निधीतून उदरनिर्वाहाचे साधन म्हणून नाशिक, ठाणे इतरत्र मिनी ट्रक, प्रवासी रिक्षा, फळ व भाजीपाल्यांचे दुकान, ब्युटी पार्लर इत्यादीसाठी कोट्यावधी रुपयांचे उपलब्ध असलेले अनुदान, मात्र, आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्याकडे लाभार्थ्यांची यादी तयार नसणे, सुमारे २०० कोटी रुपयांच्या केंद्र सरकारच्या या योजना, प्रत्यक्ष आदिवासीपर्यंत न पोहोचणे, तसेच रुपये ११० कोटीच्या औषध खरेदी मधील औषधांचे वाटप आदिवासींना न होणे, परिणामी आदिवासींमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

# - मध्यंतर -

**सात : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

**(अ)** **सर्वश्री. विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ. दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री. रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड. आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजीत पाटील, सर्वश्री. नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा प्रस्ताव -**

"गत ३६ महिन्यात वीजेचे दर तब्बल १२ वेळा वाढणे, औद्योगिक वीजेचे दरदेखील शेजारील राज्यांपेक्षा अधिक असल्याने सर्व उद्योजकांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारून तो यशस्वी करणे, वारंवार वीज दरवाढ करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने कोणातही विरोध न करता मंजूर करणे, भारनियमनमुक्तीसाठी महानिर्मितीच्या औष्णिक विद्युतनिर्मिती प्रकल्पांची वीजनिर्मिती वाढविण्याची गरज असताना प्रत्यक्षात सद्यःस्थितीत महानिर्मितीच्या औष्णिक वीज प्रकल्पांमार्फत होणारी वीज निर्मिती सन २००८ च्या तुलनेत कमी होणे, तसेच उरण व लातूर येथील गॅसवर आधारित विद्युत निर्मिती प्रकल्पामधून अपेक्षित विद्युत निर्मिती न होणे, प्रत्यक्ष वीजनिर्मितीत वाढ न झाल्याने माहे डिसेंबर, २०१२ अखेर राज्य भारनियमनमुक्त करण्याची घोषणा फसवी ठरणे, कृषीपंपांना मोफत वीज पुरविण्याची घोषणा करूनदेखील कृषीपंप धारकांकडून वाढीव दराने वीज बील आकारण्यात येणे, महाराष्ट्रातील महावितरण, महापारेषण व महाजनको या तीनही कंपन्यांचे कामकाजामध्ये प्रचंड भ्रष्टाचार होत असल्याचे उघडकीस येणे, यामध्ये प्रामुख्याने मीटर खरेदी, कोळसा खरेदी, पायाभूत सुविधांची कामे, महापारेषणमार्फत होणारी कामे इत्यादींचा समावेश असणे, इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील वीज कंपन्यांचे काम समाधानकारक नसल्याचे शुंगलु समितीने देखील आपल्या अहवालात नमूद करणे, परिणामी, वाढत्या वीजदराचा बोजा सामान्य जनतेवर पडत असल्याने त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष, यामुळे या विभागातील कारभाराबाबत श्वेतपत्रिका काढण्याची होत असलेली मागणी व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ब)** **(बुधवार, दिनांक ३ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रस्ताव) - चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर -**

**डॉ.सुधीर तांबे,** सर्वश्री प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री

मोहन जोशी, चरणसिंग सप्रा, हेमंत टकले, रमेश शेंडगे, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती अलका देसाई **वि.प.स. यांचा प्रस्ताव -**

राज्यात अपंग व्यक्तींची संख्या एकूण लोकसंख्येच्या ३ टक्के म्हणजेच सुमारे ४० लक्ष असून अपंगांच्या विविध समस्या वर्षानुवर्षे प्रलंबित असणे, अपंग व्यक्तींसाठी महानगर व नगरपालिका क्षेत्रात स्टॉल, गाळे राखून ठेवावेत असा नियम असताना ही त्याची अंमलबजावणी न होणे, अपंग विकास वित्तीय महामंडळासाठी भरीव आर्थिक तरतूद नसणे, त्यामुळे अनेक योजना केवळ कागदावर रहाणे, अपंगांना विशेष अधिकार देणाऱ्या कायद्यामध्ये सुधारणा होणे आवश्यक असणे, अपंगत्व येऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपचाराविषयी जनसामान्यांमध्ये विशेष जाणिव नसणे, जन्मतःच असलेल्या श्रवण दोषांमुळे बधीरत्व निर्माण होत असणे, कॉक्लिअर इंम्प्लांट (cochlear implant) या शस्त्रक्रियेमुळे हा दोष दूर होऊन त्या असंचय बालकांचे कर्णबधीरत्व दूर होऊ शकते, यासाठी शासनाने या शस्त्रक्रियेचा संपूर्णपणे भार उचलण्याची आवश्यकता, अपंगांसाठी असलेल्या शाळांमधील शिक्षकांच्या, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अनेक समस्या, कंत्राटी पध्दतीने नेमणुका, विनाअनुदानीत शाळांचे प्रश्न, कार्यशाळेच्या कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन देणे, यासारखे अनेक प्रश्न प्रलंबित रहाणे व अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधा संख्यात्मक जरी पुरेशा वाटत असल्या तरी जगाच्या तुलनेत त्या परिपूर्ण नसणे, शैक्षणिक दर्जा विषयी दुर्लक्ष असणे, त्यात अधिक संशोधन व स्वंतत्र व्यवस्था निर्माण करण्याची गरज असणे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व प्रोत्साहनात्मक योजनांचा अभाव असणे, याविषयी करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.

**आठ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री.नरेंद्र पाटील, व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"ढेबेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) या पोलीस स्टेशनला एकूण ३४ पदे मंजूर असताना सदर पोलीस स्टेशनमध्ये सद्यःस्थितीत ९ कर्मचारी कार्यरत असणे. या भागात धरण तसेच पवनचक्क्याबाबत आंदोलन होत असणे, तसेच मा.मुख्यमंत्री यांचे मुळगाव असल्याने किमान मंजूर असलेली पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांची पदे भरण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.चंद्रकांत पाटील व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"महाराष्ट्र राज्यात १५ वर्षाखालील मुलींची संख्या १ कोटी ४८ लाख ६८ हजार ४० इतकी असणे, त्यापैकी ८६ हजार ४६८ मुलींचा बालविवाह झाला असल्याचे सरकारी आकडेवारीवरुन स्पष्ट झाले असणे, राज्यात कुटुंब कल्याण योजनेमार्फत 'हम दो हमारे दो' या घोषवाक्याचा पूर्णपणे फज्जा उडाला असणे, राज्यात सातहून अधिक अपत्य असणाऱ्या १४ लाख ५७ हजार ८३१ महिला असल्याचे सरकारी आकडेवारी नुसार समजले असणे, त्यामुळे नागरिकांवर दोन्ही कायद्याची जरब नसल्यामुळे भविष्यात अनेक समस्यांना राज्याला सामोरे जावे लागणार असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३ एप्रिल, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.